MHWS100012652015

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०५.०८.२०१५. | | |
| नोंदणी तारीख | : | ०५.०८.२०१५. | | |
| निकाल तारीख | : | ०४.०५.२०२६ | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | १० | ०८ | ३० |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२, मालेगांव, तालुका मालेगांव, जिल्हा वाशिम यांचे न्यायालयात

## ( पीठासीन अधिकारी : अ. सु. कोष्टी )

**नियमित फौजदारी प्रकरण क्र. १३८/२०१५**

**निशाण क्र. १४०**

**गुन्हा नोंद क्र. ३७/२०१५**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस निरीक्षक, मालेगांव पोलीस स्टेशन,** ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता **सौ.एस.पी.सरकटे.** |
| आरोपीं | १. | **लक्ष्मण वासुदेव आंधळे,** वय वर्षे ३५, |
| | २. | **वासुदेव देवराव आंधळे,** वय वर्षे ६२, |
| | ३. | **सौ.बेबीताई वासुदेव आंधळे** (**मयत**), वय वर्षे ५५, |
| | ४. | **गजानन देविदास आंधळे,** वय वर्षे ४२,<br>आ.क्र.१ ते ४ राह.सुकांडा, ता. मालेगांव. |
| | ५. | **सौ.नंदाबाई त्र्यंबक तारे,** वय वर्षे ३८, |
| | ६. | **त्र्यंबक उत्तम तारे,** वय वर्षे ४०,<br>आ.क्र.५ व ६ राह.ब्राहमणवाडा, ता. मालेगांव जि. वाशिम. |
| | ७. | **सौ.नंदाबाई बाबाराव गंगावणे,**वय वर्षे ३०, |
| | ८. | **बाबाराव महादेव गंगावणे,**वय वर्षे ५५, |

| | | |
|---|---|---|
| | ९. | **सौ.चित्रा बाबाराव गंगावणे,** वय वर्षे ५०,<br>आ.क्र.८ ते ९ राह.देपुळ, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | **श्री. डी.डी.माटोळे.** |

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २७.०२.२०१५. |
| फिर्याद दाखल दिनांक | : | ०१.०३.२०१५. |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | १६.०६.२०१५. |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ०५.०८.२०१५. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १०.०८.२०१९. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०४.०५.२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| क्र. | आरोपीचे नांव | अटक/नोटीस दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (**set off**) करण्याबाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लक्ष्मण वासुदेव आंधळे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | भा.दं.सं.कलम ४९४,४९८अ, ५०६, ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | वासुदेव देवराव आंधळे, | | | | | | |
| ३. | सौ.बेबीताई वासुदेव आंधळे (**मयत**) | | | | | | |
| ४. | गजानन देविदास आंधळे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ५. | सौ.नंदाबाई त्र्यंबक तारे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ६. | त्र्यंबक उत्तम तारे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ७. | सौ.नंदाबाई बाबाराव गंगावणे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ८. | बाबाराव महादेव गंगावणे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ९. | सौ.चित्रा बाबाराव गंगावणे, | ०१.०३.२०१५ | ०५.०८.२०१५ | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष -**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सौ. अनिता लक्ष्मण आंधळे | फिर्यादी | ७० |
| २. | वसंतराव देवराव घुगे | फिर्यादीचा भाऊ | १२२ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |

**न्यायनिर्णय**

( आज दिनांक दि. ०४.०५.२०२६ ई. रोजी घोषीत )

प्रस्तुत प्रकरणी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४९४, ४९८–अ, ५०६ सहकलम ३४ अन्वये पात्र गुन्हा केलेच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

**अभियोगपक्षाचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे आहे.**

०२. फिर्यादी सौ. रेखा निवासराव गंगावणे हिने मालेगांव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की, तिचे लग्न सन २००० मध्ये आरोपी क्र.१ सोबत झाले. लग्नामध्ये त्यांच्या भावाने एक लाख रूपयाच्या वस्तू हुंडा म्हणुन दिल्या होत्या. लग्नानंतर फिर्यादी संयुक्त कुटूंबात तिचे पती व सासुसासरे यांच्यासह नांदायला गेली. फिर्यादीला रेणुका व नंदा ह्या दोन नणंद असुन त्या त्यांच्या सासरी राहतात. लग्नानंतर आरोपींनी फिर्यादीला काही दिवस चांगले वागविले. त्यानंतर त्यांचे पती, सासुसासरे, नणंद व नंदोई हे फिर्यादीला *“तुला तुझे शेत पाहीजे आसेल तर आमचे पैसे परत कर व शेत वापस घे, तुझे भावाने लग्नामध्ये हुंडा दिला नाही तसेच तुझे भावा कडुन टि.व्ही, गॅस, कुलर, व मोटार सायकल घेवुन ये तसेच आपले शेतात विहीर खोदली आपल्यावर कर्ज झाले, आपली शेती नंदोई त्रंबक तारे यांचे कडे गहाण ठेवली ती*

*शेती सोडवुन घेण्यासाठी तुझे भावा कडुन मला माहेरहुन, एक लाख रूपये हुंडा म्हणुन घेवुन ये, नाहीतर तुला नादु देणार नाही"* असे म्हणुन फिर्यादीचे पती त्यांना शिवीगाळ करून चापटाबुक्यांनी मारहाण करायचा. आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या भावाला भेटुन पैशाची मागणी करून *"तु जर ५० हजार रूपये दिले नाहीतर मी दुस–या मुलीशी लग्न करीन"* अशी धमकी दिली. त्यावरून फिर्यादीचे भावाने आरोपी क्र.१ याला पन्नास हजार रूपये दिले. त्यानंतर आरोपी क्र.१ पासून फिर्यादीला एक मुलगी रेशम व मुलगा हरीओम अशी दोन अपत्ये झाली तरी देखील आरोपींच्या वागण्यामध्ये कोणत्याही प्रकारची फरक पडला नाही. आरोपी फिर्यादीचा दवाखाणा करत नसत. सदर बाब फिर्यादीने त्यांचा मोठा भाऊ वसंता व माहेरकडील लोकांना सांगितली.

०३. त्यानंतर दि. १५/०५/२०१४ रोजी फिर्यादीचा भाउ वसंता देवराव घुगे हा फिर्यादीच्या सासरी आला तेव्हा फिर्यादीचे पती, सासुसासरे, दिर हे फिर्यादीचे भावाला *"तुझे बहिणीला चांगले वागवायचे असेल तर एक लाख रूपये घेवुन ये नाहीतर माझे पतीचे दुसरे लग्न लावून देवू"* अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीचे भावाने आरोपींची मागणी मान्य करून दि.१५/०८/२०१५ *सोयाबीन पीक आल्यावर पैसे आणून देतो* असे म्हटले. त्यानंतर फिर्यादीचे मुलाला शाळेच्या सुट्या लागल्याने आरोपी क्र.१ ने त्यांना दि. ३१/५/२०१४ रोजी माहेरी किनखेड येथे नेवून घातले व *"आता पैसे घेवूनच माझे घरी यायचे नाहीतर नाही. नाहीतर मी दुसरे लग्न करीन तुझे सोबत संसार करणार नाही"* असे म्हणुन निघुन गेला.

०४. त्यानंतर दि.३०/०६/२०१४ रोजी फिर्यादीचा भाउ वसंता देवराव घुगे ह्यांना बंडू विश्वनाथ थोरात व देवराव रंगलाल आडे यांनी आरोपी क्र.१ चे इतर आरोपींनी दि. १९.०६.२०१४ रोजी अंबादेवी संस्थान रूद्राणी माता मंदीर येथे दुसरे लग्न लावून दिल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या पतीची दुसरी बायको नंदाबाई हिने लग्नाची सुरक्षा म्हणुन त्यांच्या सासुचे नांवे असलेली एक एकर जमीन खरेदी करून दिली असुन नंदाबाई ही त्यांच्या पतीचे घरी राहत आहे. त्यानंतर दि. १०/०७/१४ रोजी फिर्यादी, त्यांचा भाऊ व इतर नातेवाईक हे त्यांच्या सासरी गेले असता फिर्यादीचे पतीने व त्याच्या बायकोने फिर्यादीला*"तु येथुन चालती हो"* असे म्हणुन शिवीगाळ केली व इतर आरोपींनी त्यांना गावातुन हाकलून दिले.

०५. त्यानंतर दि.१२/०७/२०१४ रोजी फिर्यादी, त्यांचा भाउ असे देपुळ, ता. जि. वाशीम येथे आरोपी बाबाराव महादेव गंगावणे यांचे घरी गेले आसता त्याठीकाणी बाबाराव

गंगावणे, त्याची पत्नी चीत्रा गंगावणे, प्रदिप बाबाराव गंगावणे, संदिप बाबाराव गंगावणे यांनी फिर्यादीला *“माझे पती सोबत आम्ही नंदाबाई गंगावणे हीचे लग्न लावुन दिले आहे. आता त्यांचे लग्न मोडता येत नाही. व तुमचे साठी चांगले होईल तुम्ही तुमचे पती कडुन फारकती करून घ्या* असे म्हटले असता फिर्यादीचे भाव्याने त्यांना *तुमची नंदाबाई ही लक्ष्मण आंधळे अवैध पत्नी म्हणुन त्याचे सोबत राहत आहे”* असे म्हटले असता त्यांनी *“आम्ही आमची मुलगी दिली आहे. तुमच्याने काय होते ते करून घ्या”* असे म्हणुन त्यांच्याशी वाद घातला. त्यामुळे आरोपींच्या उपरोक्त कृत्यामुळे फिर्यादीने पोलीस ठाण्यात रिपोर्ट दाखल केला.

०६. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे, मालेगांव यांनी आरोपींविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४९८-अ,४९४,५०६,३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याच्या आरोपाखाली गुन्हा रजि. क्र. ३७/२०१५ दाखल केला. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४९४,४९८-अ,५०६,३४ अन्वये गुन्हा केल्या प्रकरणी आरोपपत्र सादर करण्यात आले.

०७. त्यानंतर आरोपीविरुध्द निशाण क्र.२७ वर भारतीय दंड संहितेचे कलम ४९४, ४९८-अ, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यासाठी आरोप निश्चीत केले. आरोपीला ते मराठीत समजावून सांगितले असता आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून प्रकरणात सुनावणी घेण्याची मागणी केली. आरोपी क्र.३ सौ. बेबीताई वासुदेव आंधळे ह्या मयत झाल्यामुळे त्यांच्याविरूध्द प्रकरण दि.२३.०३.२०२२ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत करून उपशमित (Abated) करण्यात आले.

०८. माझ्यासमोर उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २७.०२.२०१५ रोजी ग्राम सुकांडा, ता. मालेगांव येथे आरोपी क्र.१ याने पत्नी फिर्यादी जीवंत असतांनाच्या काळात *आरोपी क्र.७* यांचे सोबत पुन्हा विवाह केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम **४९४** सह ३४ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | **नकारार्थी** |
| २. | आरोपी क्र.१ पती व इतर आरोपी क्र.२ ते ९ यांनी संगनमत करुन वर | **नकारार्थी** |

नमुद दिवशी, वेळी फिर्यादीला एक लाख रूपयाची हुंड्याची मागणी केली व फिर्यादीचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केला त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम **४९८अ** सह ३४ अन्वये गुन्हा केला ?

| | | |
|---|---|---|
| ३. | आरोपींनी संगनमत करुन वर नमुद दिवशी, वेळी फिर्यादीला फौजदारी पात्र धाकदपटशा करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम **५०६** सह ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ च्या अनुषंगाने</u> :**

०९. अ.सा.क्र.१ फिर्यादी सौ. अनिता लक्ष्मण आंधळे हिची साक्ष निशाणी क्र. ७० वर नोंदवली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये आरोपी क्र.१ हे त्यांच पती असल्याचे, इतर आरोपी हे त्यांचे कुटूंबीय असल्याचे, त्यांचे लग्न आरोपी क्र.१ सोबत सन २००० मध्ये झाल्योचे, लग्ननंतर त्या आरोपीसोबत ग्राम सुकांडा येथे नांदावयास गेल्याचे, आरोपींनी काही दिवस त्यांना चांगले वागविल्याचे, त्यांचे लग्न किनखेड येथे झाल्याचे, लग्नाचा खर्च त्यांचे वडील नसल्यामुळे त्यांच्या भावाने केल्याचे, त्यांचा भाऊ शेती करत असल्याचे व त्या त्यांच्या भावाकडे किनखेड येथे राहत असल्याचे, त्यांना आरोपी क्र.१ पासुन एक मुलगी व एक मुलगा असल्याचे, त्यांचे व त्यांच्या पतीचे किरकोळ कारणावरून भांडण झाल्याचे, त्यानंतर त्यांनी आरोपींविरूध्द पोलिस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. परंतु रिपोर्ट वर त्यांची सही असुन त्यातील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे तसेच आरोपींनी भावाने लग्नात हुंडा दिला नाही म्हणुन घरगुती सामान, टीव्ही व मोटरसायकल आणण्याकरीता तसेच एक लाख रूपये घेवून ये असे म्हणुन शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास दिल्याचे स्पष्टपणे अमान्य केलेले आहे. फिर्यादी ही अभियोगपक्षास साथ देत नसल्यामुळे त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासणीमध्ये तिने आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे.

१०. तसेच वसंतराव देवराव घुगे (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीत ते सर्व आरोपींना ओळखत असुन फिर्यादी त्यांची बहिण असल्याचे, आरोपी क्र.१ हा फिर्यादीचा पती

असुन आरोपी क्र.२ हा सासरे असल्याचे, लग्नानंतर त्यांची बहिण आरोपी क्र.१ सोबत सुकांडा येथे नांदायला गेल्याचे, त्यानंतर फिर्यादी व तिच्या पतीची बोलचाल झाल्यामुळे फिर्यादीने तक्रार दिल्याचे व याव्यतिरीक्त काही झाले नसल्याचे तसेच आरोपींनी लग्नात हुंडा दिला नाही म्हणुन त्यांच्या बहिणीला घरगुती सामान टिव्ही व मोटरसायकल तसेच एक लाख रूपये घेवून ये असे म्हणुन शारीरिक व मानिसक त्रास दिला नसल्याचे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास साथ देत नसल्यामुळे त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासणीमध्ये विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारात्मक उत्तरे दिली आहेत. तसेच, साक्षीदाराची आरोपींसोबत समजुत झाली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाला व पुराव्यास दुजोरा व पुष्टी देणारा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

११. एकंदरीत अभिलेखावरील दाखल साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादी व साक्षीदाराची आरोपींसोबत तडजोड नि.क्र.१२१ वरून झाली असल्याचे दिसुन येते. फिर्यादीने नि.क्र.१२३ वर इतर कोणाचीही साक्ष घेणे नसल्याबाबत पुर्सिस देखील दिली आहे. तसेच फिर्यादीने आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे कथन केलेले आहे. सदरची बाब विचारात घेता त्यांच्यातील पुढील वाद टाळण्यासाठी फिर्यादी विरुध्द खोटी साक्ष दिल्याबाबत कार्यवाही करणे योग्य व न्यायोचीत होणार नाही.

१२. सबब संपुर्ण पुरावा पाहता तो आरोपींविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप शंकेपलिकडे सिध्द करण्यासाठी पुरेसा नसल्याचे दिसुन येते.

१३. एकंदरीतपणे फिर्यादी व साक्षीदार यांच्या साक्षीवरुन आरोपी क्र. १ ते ९ यांच्याविरुध्द भारतीय दंड संहिता प्रमाणे निवेदन सिध्द करण्यासाठी आवश्यक असणा–या कोणत्याही तरतुदी सिध्द केलेल्या नाहीत. अभियोगपक्षातर्फे आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप कोणत्याही वाजवी शंकेपलीकडे सिध्द करण्यासाठी आवश्यक असणारा कोणताही समर्पक तोंडी अथवा लेखी पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींविरुध्द दाखल केलेला दोषारोप निष्फळ ठरतो. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ च्या अनुषंगाने</u> :**

१४. मुद्दा क्र. १ ते ३ च्या नकारार्थी उत्तरादाखल आरोपी क्र.१ ते ९ यांना भारतीय दंड संहितेचे कलम ४९४, ४९८–अ, ५०६, ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केलेच्या

आरोपातून मुक्त करावे लागेल. उपरोक्त सर्व कारणांस्तव मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर त्याप्रमाणे दिलेले आहे व खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र. १, २, ४ ते ९ नामे **लक्ष्मण वासुदेव आंधळे, वासुदेव देवराव आंधळे, गजानन देविदास आंधळे, सौ. नंदाबाई त्र्यंबक तारे, त्र्यंबक उत्तम तारे, सौ.नंदाबाई बाबाराव गंगावणे, बाबाराव महादेव गंगावणे व सौ.चित्रा बाबाराव गंगावणे** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ४९४, ४९८–अ, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केलेच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपी क्र. १, २, ४ ते ९ यांना मा. अपेलेट न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– (अक्षरी रक्कम दहा हजार मात्र) प्रत्येकी वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबाची पुर्तता यापुर्वीच केलेली आहे. आरोपींचे सदर बंधपत्र सहा महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द समजण्यात यावे.

( खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित केला )

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.05.04 17:21:15 +0530

स्थळ : मालेगांव.

दिनांक : ०४.०५.२०२६

**[ अ. सु. कोष्टी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय क्र.२
मालेगांव, जि. वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Judgment :-

| | | |
|---|---|---|
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B.Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon |
| 3. Judgment dated | :- | 04.05.2026. |
| 3. Judgment Signed by the P.O. | :- | 04.05.2026. |
| 4. Judgment uploaded on | :- | 04.05.2026. |